शासन निर्णय :-

मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळांतील लेखा विषयक बाबींना आढावा घेण्यासाठी व योग्य तो निर्णय सक्षमतेने घेण्यासाठी शिक्षण उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यबळ गट स्थापन करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर कार्यबळ गटाची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

| | | |
|---|---|---|
| (१) | विभागीय शिक्षण उपसंचालक | - अध्यक्ष |
| (२) | संबंधित विभागातील सर्व लेखाधिकारी | - सदस्य |
| (३) | शिक्षण उपसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी | - सदस्य सचिव |

कार्यबळ गटाने पार पाडावयाची काम :-

(१) वेतननिश्चितीमध्ये झालेल्या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी प्राप्त झालेल्या अपीलांवर निर्णय देणे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी वेतननिश्चितीमधील चुकीची दुरुस्ती करण्याकरिता प्राप्त होणारे अर्ज शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करावेत. शिक्षण उपसंचालक यांनी हे सर्व अर्ज कार्यबळ गटाच्या बैठकीसमोर ठेवावेत. शिक्षक अथवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सादर केलेले पुरावे व कार्यालयीन अभिलेख निर्णय घेण्याकरिता पुरेसे नसल्यास संबंधितांचे म्हणणे ऐकून घेवून कार्यबळ गटाने निर्णय घ्यावा. कार्यबळ गटाने घेतलेले निर्णय विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधितांस कळवावे. तपासलेले अभिलेख व अर्जदाराचे म्हणणे व त्यावरील निर्णय इतिवृत्तामध्ये घेण्यात यावा.

(२) खाजगी संस्थेच्या मालकीच्या इमारतीचे भाडे निश्चित करणे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्राप्त होणारी भाड्याची प्रकरणे शिक्षण उपसंचालक यांनी कार्यबळ गटासमोर ठेवावी. भाड्याचा प्रस्ताव प्रचलित नियमाप्रमाणे तपासून भाडे निश्चितीचा निर्णय बैठकीत घेण्यात यावा. प्रस्ताव अपुरा असल्यास त्रुटी पूर्ततेसह पुढील बैठकीच्या तारखेपूर्वी तो फेर सादर करण्याच्या सूचना शिक्षण उपसंचालकांनी संबंधितांस द्याव्या.

मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील लेखाविषयक बाबीचा आढावा घेण्यासाठी कार्यबळ गटाची ( Task Force) स्थापना.

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण विभाग

शासन निर्णय,क्रमांकः एचएससी-१३९८/(२१२४)/उमाशि-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- २९ फेब्रुवारी,१९९९.

संदर्भ : शासन पत्र, क्रमांक एसएसएन २६८२/९७१/माशि-२,दिनांक ३०.५.१९८३

प्रस्तावना :-

मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी व [illegible]मचा-यांची वेतननिश्चिती त्यांच्या संबंधित संस्थेने केल्यानंतर लेखाधिकारी त्याची तपासणी करुन ती मान्य करतात. परतु काही प्रकरणी विकल्प, सेवाखंड, वरिष्ठ श्रेणी इत्यादि कारणांमुळे लेखाधिका-यांनी केलेली वेतननिश्चिती चुकीची असल्याचे निदर्शनास येते. अशा वेळी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी त्यांच्या वेतननिश्चितीत झालेली चूक दुरुस्त करुन पुनर्वेतननिश्चिती करण्याबाबत संबंधित शिक्षण उपसंचालकांकडे त्यांच्या संस्थांमार्फत तक्रार करतात. चुकीची वेतन निश्चिती दुरुस्त करण्याचा अधिकार शासनास असल्याने शिक्षण उपसंचालक पुनर्वेतननिश्चितीचा प्रस्ताव शासनाकडे वरील संदर्भानुसार पाठवितात. काही वेळा पुनर्वेतननिश्चिती प्रकरणाबाबतचे अभिप्राय शासनाकडे वेळेत प्राप्त होत नाहीत. त्यामुळे अशी प्रकरणे नि[illegible] काढण्यास विलंब होतो. परिणामी सेवानिवृत्ती वेतन मंजूरीची प्रकरणेही निकाली काढण्यास विलंब होतो. [illegible]शिवाय लेखाविषयक बाबींचा उदा.खाजगी संस्थेच्या इमारतीचे भाडे निश्चित करणे, मान्यताप्राप्त विना अनुदानित शाळांच्या फी वाढीची प्रकरणे तपासून सक्षम अधिका-याकडे योग्य ती शिफारस करणे, अनुज्ञेय न ठरविलेल्या खर्चाच्या बाबींवरील प्राप्त अपीलांवर निर्णय देणे, संस्थेवरील वसुली व लेखा परिक्षणाबाबतचा आढावा घेणे ही कामे सक्षमतेने पार पाडणे आवश्यक आहे. या सर्व बाबीसाठी एक कार्यबळ गट स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

(३) मान्यताप्राप्त विना अनुदानित शाळांच्या शिक्षण शुल्कांचे दर ठरविणे

संबंधित जिल्ह्याच्या लेखाधिका-यांनी तपासून पाठविलेले फी वाढीचे सर्व प्रस्ताव शिक्षण उपसंचालकांनी कार्यबळ गटाच्या बैठकीसमोर निर्णयास्तव ठेवावे. नियमाप्रमाणे शालेय कामकाजाकरिता अनुज्ञेय ठरणा-या खर्चाच्या बाबी विचारात घेवून दरडोई, दरमहा शिक्षण शुल्काची रक्कम निर्धारित करुन प्रस्ताव प्राधिकृत अधिका-यांकडे मंजूरीस्तव शिक्षण उपसंचालकांनी पाठवावे.

(४) अनुज्ञेय न ठरविलेल्या खर्चाच्या बाबीबाबत प्राप्त होणा-या अपीलांवर निर्णय घेणे.

अनुदान निर्धारणाचे वेळी शालेय खर्चाच्या काही बाबी शिक्षणाधिकारी यांनी अनुज्ञेय न ठरविल्यामुळ संस्थाचालक/मुख्याध्यापक यांनी शिक्षण उपसंचालक यांच्याकडे अपील दाखल करावे. कार्यबळ गटाच्या बैठकीचे वेळी शिक्षण उपसंचालक यांनी उपस्थित सदस्यांना अपील प्रस्ताव तपासण्याकरिता द्यावेत. अपीलातील मुद्यांवर सदस्यांनी आपले स्पष्ट अभिप्राय देवून, अपीलावरील आपले अभिप्राय पुढील बैठकीत सादर करावे. त्या बैठकीत अपीलावर निर्णय घेण्यात यावा. तपासणीअंती अपीलावर कार्यबळ गटाने घेतलेला निर्णय शिक्षण उपसंचालकांनी संबंधित संस्थेला विनाविलंब पाठवावा.

(५) लेखाविषयक बाबींचा जिल्हानिहाय आढावा घेणे :-

कार्यबळ गटाच्या सदस्यांचा लेखाविषयक बाबींचा कार्यपूर्तीचा आढावा शिक्षण उपसंचालक यांनी या बैठकीत घ्यावा.

(क) विविध संस्थाकडील वसूली.
(ख) प्रलंबित लेखा परीक्षण.
(ग) शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची वेतन निश्चिती.
(घ) विद्यार्थ्यांच्या विविध सवलतींच्या अर्जाची पडताळणी

वरील (क) ते (घ) विषयाबाबत गतीमानता कशी आणता येईल, याबाबत चर्चा करावी व प्रत्येक महिन्याचे लक्ष्य ठरवावे. ठरविलेले लक्ष्य पूर्ण केले किंवा कसे याबाबतचा आढावा पुढील बैठकीत घेण्यात यावा.

कार्यबळ गटाची कार्यपद्धती :-

(१) कार्यबळ गटाची बैठक महिन्यातून एकदा एका विशिष्ट तारखेला अथवा दिवशी आयोजित करण्यात यावी.

(२) कार्यबळ गटाच्या स्थापनेबाबत व कार्यपद्धतीबाबत सर्व संस्था प्रमुखांना परिपत्रकाव्दारे माहिती देण्यात यावी.

(३) कार्यबळ गटासमोरील सर्व विषयांवर देण्यात आलेल्या विषयांचा साकल्याने विचार व्हावा. पूर्ण विचारांती निर्णय घेतला जावा.

(४) विषयवार पार पडणारी चर्चा व घेतलेले निर्णय याबाबतचे मुद्देसूद इतिवृत्त ठेवण्यात यावे.

(५) बैठकीत घेतलेले निर्णय सर्व संबंधिताना बैठकीच्या तारखेपासून एक आठवड्याने आत कळविण्यात यावे.

(६) फी वाढीचे प्रस्ताव, इमारत भाडे निश्चित करण्याचे प्रस्ताव व अपीलाचे प्रस्ताव पडताळणीकरिता संबंधित जिल्ह्याच्या लेखाधिका-यांकडे पडताळणीकरिता शक्यतो देवू नयेत.

(७) बैठकीसमोर येणा-या प्रस्तावाची पडताळणी पुढील बैठकीपर्यंत प्रलंबित न ठेवता शक्यतो त्याच दिवशी पडताळणी करुन घ्यावी.

(८) कार्यबळ गटाच्या कामात पारदर्शकता निर्माण होणे आवश्यक आहे. या दृष्टीने बैठकीच्या दुस-या दिवशी शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सूचना फलकावर प्राप्त प्रस्ताव व त्यावर कार्यबळ गटाने घेतलेले निर्णय प्रदर्शित केले जावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( ज. मो. अभ्यंकर )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/(माध्यमिक), जिल्हा परिषद,
सर्व जिल्ह्यातील लेखाधिकारी,
कार्यासने प्राशि-१/३, माशि-२, माशि-३, माशि-५, माशि-६, शालेय शिक्षण विभाग,
प्रत. निवड नस्ती, कार्यासन उमाशि-१